अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | गुरुवार
१५.१०.२०२६

# वरुड दर्पण

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www.waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २५६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### आयडीबीआय बँकेतील हिस्सा फेअरफॅक्सला विकणार : तब्बल ५२,८७८ कोटी रुपयांची डील

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी (दि.१४) आयडीबीआय बँकेतील ६०.७२ टक्के हिस्सा फेअरफॅक्स फायनान्शियल होल्डिंग्स या कंपनीला ५२,८७८ कोटी रुपयांना विकण्यास मंजुरी दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे सरकारी मालकीच्या बँकांच्या खासगीकरणाच्या इतिहासात एका नवीन पर्वाची सुरुवात होण्याची शक्यता आहे. आयडीबीआय बँकेच्या पुनर्रचनेचा हा प्रस्ताव गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित होता. त्यावर अखेर मंत्रिमंडळाने शिक्कामोर्तब करून देशाच्या वित्तीय क्षेत्रात खासगी गुंतवणुकीला मोठे प्रोत्साहन दिले आहे.

### महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांना केंद्राकडून मदत मिळावी

# सुनील तटकरे यांनी घेतली पंतप्रधान मोदींची भेट

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन दुष्काळग्रस्त भागांना केंद्र सरकारकडून आवश्यक मदत मिळावी, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी गुरुवारी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांना मदत मिळावी, यासाठी त्यांनी पंतप्रधानांकडे हा विषय मांडला.



महाराष्ट्रातील काही भागांमध्ये निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने आवश्यक सहकार्य करावे, अशी अपेक्षा या भेटीत व्यक्त करण्यात आली. दुष्काळाचा सामना करणाऱ्या नागरिकांना दिलासा मिळण्यासाठी केंद्राकडून मदत मिळणे महत्त्वाचे असल्याचे या मागणीमागील उद्दिष्ट आहे.

**रोहा रेल्वे स्थानकाच्या विकासासाठीही विनंती**

या भेटीदरम्यान रायगड जिल्ह्यातील रोहा रेल्वे स्थानकाच्या उन्नतीकरणाचा विषयही सुनील तटकरे यांनी पंतप्रधानांसमोर मांडला. या कामासाठी केंद्र सरकारकडून निधी मंजूर झाला असून, या महत्त्वपूर्ण विकासकामाच्या भूमिपूजनासाठी वेळ द्यावा, अशी विनंती त्यांनी केली.

रोहा रेल्वे स्थानकाच्या उन्नतीकरणामुळे परिसरातील रेल्वे सुविधांच्या विकासाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे या कामाला गती मिळावी, यासाठी तटकरे यांनी पुढाकार घेतला आहे.

**महाराष्ट्राच्या मदतीसाठी प्रयत्नशील**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीची माहिती सुनील तटकरे यांनी समाजमाध्यमांवरील 'एक्स' या खात्यावरून दिली. महाराष्ट्रातील जनतेला आवश्यक मदत मिळावी आणि रायगड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळावी, यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.

दुष्काळग्रस्त भागांसाठी केंद्र सरकारकडून मदत मिळवणे आणि रोहा रेल्वे स्थानकाच्या उन्नतीकरणाचे काम पुढे नेणे, या दोन्ही मुद्द्यांकडे या भेटीमुळे लक्ष वेधले गेले आहे.

# दिवंगत नाना पाटेकरांना भाजपने दिली होती लोकसभा लढवण्याची ऑफर, मंत्री आशिष शेलार यांचा दावा

### देवेंद्र फडणवीसांसोबत स्वत: भेट घेतल्याची सांगितली आठवण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – दिवंगत अभिनेते नाना पाटेकर यांना भाजपकडून लोकसभा निवडणूक लढवण्याची ऑफर देण्यात आली होती. मात्र, राजकारणात प्रवेश करण्यास नकार देताना नानांनी आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे मित्र म्हणून असलेले संबंध अडचणीत येऊ शकतात, असे सांगत ही विनंती नम्रपणे नाकारली होती. माहिती व तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी नाना पाटेकर यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा देताना हा किस्सा सांगितला.

नाना पाटेकर यांच्या निधनानंतर मुंबईत आयोजित शोकसभेत शेलार बोलत होते. त्या वेळी भाजपचे तत्कालीन प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस आणि मुंबई अध्यक्ष असलेले आपण नाना पाटेकर यांना भेटण्यासाठी गेलो होतो, अशी आठवण त्यांनी सांगितली. एका अभिनेत्याला लोकसभेच्या निवडणुकीत उमेदवारी द्यावी, अशी चर्चा पक्षात सुरू होती. त्यानुसार फडणवीस आणि आपण नानांना निवडणूक लढवण्याची विनंती केली होती. मात्र, नानांनी लगेच उत्तर न देता दोघांना दुसऱ्या दिवशी दुपारनंतर वेळ आहे का, अशी विचारणा केली. त्यानंतर ठरलेल्या दिवशी घरी बोलावून जेवण झाल्यावर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

### दुर्गोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी

# शहरात पोलिसांचे पथसंचलन व रंगीत तालीम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – दुर्गोत्सव, दिवाळी, दसरा आणि इतर सणांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी वरुड शहरात पोलिसांच्या वतीने पथसंचलन करण्यात आले.

यावेळी मोर्शीचे उपविभागीय पोलीस अधिकारी उमेश पाटील यांच्या उपस्थितीत पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शहरातील मिश्र वस्ती तसेच दुर्गा विसर्जन मार्गाची पाहणी केली.





रूट मार्चदरम्यान विसर्जन मार्गावरील विविध धार्मिक स्थळे, संवेदनशील ठिकाणे आणि परिसराची माहिती सहभागी अधिकारी व अंमलदारांना देण्यात आली. दुर्गोत्सव व विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी पोलिस यंत्रणेने विशेष खबरदारी घेतली.

यानंतर नगरपरिषद मराठी शाळेच्या मैदानावर दंगा काबू योजनेची रंगीत तालीम घेण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत जमावावर नियंत्रण मिळविणे, परिस्थिति हाताळणे आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांचा सराव यावेळी करण्यात आला.

या रुट मार्च व दंगा काबू योजनेच्या रंगीत तालीममध्ये पोलीस ठाण्याचे ६ अधिकारी, २६ अंमलदार, ४० सैनिक, शेंदुरजनाघाचे १ अधिकारी, ५ अंमलदार, ५ सैनिक, एसआरपीएफचे २८ सैनिक ग्रुपचे ४ अंमलदार, आरसीपीचे १० अंमलदार, नाशिक प्रशिक्षण केंद्रातील २ पीएसआय, एसआरपीएफची एक प्लाटून क्र.३, आरसीपी १ प्लाटून सहभागी झाले होते. दुर्गोत्सव काळात नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या पथसंचलन प्रसंगी पोलिस निरिक्षक दिनेश चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरिक्षक राहुल जाधव, निलेश गोपालचावडीकर, गोपीनाथ वाघमारे, पोलिस उपनिरिक्षक सिध्दार्थ उमाळे, प्रविण कराड, मोनिका मांदळे, श्रीकांत विखे आदी अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते.









# खाजगी व्यापारी, दलालांकडून होणारी आर्थिक पिवळणुक थांबवा

## संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे मागणी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांची खाजगी व्यापारी, दलालांकडून होणारी आर्थिक पिवळणुक थांबवुन योग्य बाजारभाव पारदर्शक वजन पध्दती शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने उपाययोजना करण्यात याव्या, अशी मागणी संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसह इतरांकडे केली आहे.




या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड तालुक्यातील संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांची खाजगी व्यापारी व दलालांकडून होणारी आर्थिक पिळवणूक तातडीने थांबवावी, प्रत्येक टनामागे एक क्विंटल मालाची सुट घेतली जात असल्याच्या तक्रारींची चौकशी करुन अशा प्रकारच्या अन्यायावर, कपातीवर नियमानुसार कार्यवाही करावी, २७ किलोच्या कॅरेटच्या व्यवहारात शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, यासाठी वजन व कॅरेटच्या व्यवहारात पारदर्शकता आणावी, संत्रा, मोसंबीच्या खरेदी विक्री साठी योग्य बाजारभाव व्यवस्था निर्माण करुन शेतकऱ्यांना त्यांच्या मालाचा योग्य बाजारभाव मिळवुन द्यावा, संत्रा, मोसंबीचे दर, वजन, कॅरेटचे वजन आणि मालाच्या दर्जानुसार होणाऱ्या कपाती याबाबत स्पष्ट नियम व माहिती शेतकऱ्यांना उपलब्ध करुन द्यावी, खाजगी व्यापारी व दलालांच्या व्यवहारावर नियमानुसार देखरेख ठेवून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी सुरेंद्र ठाकरे, अंकुश बोडनासे, चंद्रकांत बोडनासे, दिलीप भोयर, अशोक वानखडे, विक्रम जैस्वाल, अजिंक्य देशमुख, प्रतिक खेरडे, प्रफुल्ल तडस, दामोधर होले, सुरेंद्र ठाकरे, प्रविण कोहळे, सुनिल चौधरी, राजेंद्र खोडस्कर, ज्ञानेश्वर टाकरखेडे, बंडु साउत आदींनी केली आहे.

# मानसिक आजाराने त्रस्त युवकाची बेनोडा येथे आत्महत्या : परिसरात हळहळ

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – येथील एका ३२ वर्षीय युवकाने घराच्या मागील बाजूस असलेल्या गुरांच्या गोठ्यामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना १३ ऑक्टोबर रोजी सकाळी उघडकीस आली. सुमित गणेश गंधमाले असे मृत युवकाचे नाव असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुमित हा मागील काही काळापासून मानसिक आजाराने त्रस्त होता. त्याच्यावर उपचारही सुरू होते. दरम्यान, मंगळवारी सकाळी घराच्या मागील बाजूस असलेल्या गुरांच्या गोठ्यामध्ये तो मृतावस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच कुटुंबियांनी संबंधित यंत्रणेला कळविले. मृत सुमितचे वडील गणेश गंधमाले यांनी या घटनेची माहिती बेनोडा पोलिसांना दिली. मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे त्यांनी जबानीत नमूद केल्याची माहिती आहे.

घटनेची नोंद घेत बेनोडा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेमुळे गंधमाले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, परिसरातून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## दुर्गोत्सव व इतर सणांच्या पाश्र्वभुमिवर

# शहरात पोलिसांचे पथसंचलन : दंगा काबु पथकाची हजेरी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – शहरात दुर्गोत्सव आणि येणाऱ्या सणांच्या पार्श्वभुमिवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांकडून शे.घाट व मलकापूर परिसरातील संवेदनशील भागातुन उपविभागीय पोलिस अधिकारी उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनात व ठाणेदार राहुल गवई यांच्या उपस्थितीत पोलिसांचे पथसंचालन पार पडले आहे. रूट मार्चदरम्यान विसर्जन मार्गावरील विविध धार्मिक स्थळे, संवेदनशील ठिकाणे आणि परिसराची माहिती सहभागी अधिकारी व अंमलदारांना देण्यात आली. दुर्गोत्सव व विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये, तसेच कायदा व सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी पोलिस यंत्रणेने विशेष खबरदारी घेतली. सदर पथसंचलन बसस्थानक, टिपुशापुरा, गुजरी बाजार, आठवडी बाजार, मच्छीबाजार, गफ्फार चौक, दिक्षाभुमी चौक या मार्गावरुन घेण्यात आले. यावेळी शे.घाट येथील ३ अधिकारी, १३ अंमलदार, १२ सैनिक, वरुड येथील १ अधिकारी, ७ अंमलदार, ५ सैनिक, बेनोडा येथील १ अधिकारी ४ अंमलदार, ४ सैनिक, एस.आर.पी.एफ प्लॉटुन , आर.सी.पी.प्लॉटुन क्र ३, दंगा काबु पथक उपस्थित होते.



**वरुड :** पवनी (स.) येथील श्री यशवंतबाबा विद्यालयातील सहा.शिक्षक धिरजकुमार चौधरी यांना वाढदिवसानिमित्त्य पुष्पगुच्छ देवुन शुभेच्छा देतांना पंचायत समिती माजी सभापती निलेश मगर्दे, भाजपा जेष्ठ कार्यकर्ते निळकंठ मुरुमकर, प्रविण बोराळकर तथा चिमुकला उर्विल चौधरी.

# शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत वाचन प्रेरणा दिन उत्साहात

## विद्यार्थ्यांनी घेतला वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याचा संकल्प

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारे संचालित शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी येथे भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि वाचन संस्कृतीला चालना मिळावी, हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम तसेच भारताचे पहिले कृषिमंत्री व शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देण्यात आले. नियमित वाचनामुळे ज्ञानात भर पडते, विचारशक्ती विकसित होते आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो, असे मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध पुस्तके वाचून आपले ज्ञान समृद्ध करण्याचा संकल्प केला. याप्रसंगी विद्यालयातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वाचनाचे महत्त्व विशद करणारी भाषणे सादर केली. या कार्यक्रमाला विद्यालयाचे मुख्याध्यापक अजय धोटे, उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकूलकर, पर्यवेक्षक दीपक ठाकरे, पर्यवेक्षिका प्रेमा नवरे, शिक्षक प्रतिनिधी संदीप ठाकरे, ग्रंथपाल प्रदीप धोटे आणि जया धाकिते यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोनाली खडसे यांनी केले, तर आश्लेषा जाधव यांनी आभार प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत लोककलेतून शासकीय योजनांची जनजागृती

## सेवा संकल्प अभियानांतर्गत विद्यार्थ्यांचे प्रभावी पथनाट्य सादरीकरण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मोर्शी** – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित शिवाजी उच्च माध्यमिक शाळा, मोर्शी येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत शासकीय योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने लोककलेच्या माध्यमातून पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

या पथनाट्यात विद्यार्थ्यांनी संवाद, अभिनय आणि लोककलेच्या माध्यमातून विविध शासकीय योजनांचे उद्दिष्ट, त्यांचे लाभ तसेच योजनांचा लाभ घेण्याची प्रक्रिया याबाबत जनजागृती केली. लोककला हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम असून, मनोरंजक व सोप्या पद्धतीने शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, आत्मविश्वास, संघभावना आणि कलागुणांचा विकास होण्यास मदत झाली. तसेच समाजातील विविध घटकांपर्यंत शासकीय योजनांची माहिती पोहोचविण्याच्या कार्यात विद्यार्थ्यांचा सहभाग अधोरेखित झाला.

याप्रसंगी मोर्शी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी डॉ.नितीन उंडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अजय धोटे, उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकूलकर, पर्यवेक्षक दीपक ठाकरे आणि पर्यवेक्षिका प्रेमाताई नवरे उपस्थित होते. या पथनाट्य सादरीकरणासाठी आश्लेषा जाधव, मोनिका खडसे आणि श्रीकांत काकड यांचे मार्गदर्शन लाभले.

# विद्यार्थी आंदोलनाच्या आड येऊ नका : राहुल गांधी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंदोलक विद्यार्थ्यांच्या मार्गात अडथळा आणू नये, कारण हे विद्यार्थी देशाचा खरा आवाज आहेत, असा इशारा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल यांनी यांनी बुधवारी दिला. एसआयआर प्रक्रियेतील कथित अनियमिततेविरोधात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरुद्ध नुकत्याच झालेल्या आंदोलनादरम्यान जखमी झालेल्या काही विद्यार्थ्यांना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी बुधवारी १० जनपथ येथे भेट दिली, त्यानंतर गांधी यानी हा इशारा दिला. जेव्हा हे संपूर्ण प्रकरण संपेल, तेव्हा आम्ही न्याय मिळवून देऊ आणि आपल्या मुलांवर हात उगारणाऱ्या दोषींना, वरपासून खालपर्यंत म्हणजेच नरेंद्र मोदी, अमित शहा, ज्ञानेश कुमार यांच्यापासून ते प्रत्येकाला शिक्षा करू.

# निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

## मोर्शीत काँग्रेसचे तीव्र निदर्शने : सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणला

(प्रतिनिधी वरुड दर्पण)







**मोर्शी** – भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या मोर्शी शहर शाखेच्या वतीने निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अन्यथा केंद्र सरकारने त्यांना बडतर्फ करावे, या मागणीसाठी मोर्शी येथे तीव्र निदर्शने करण्यात आली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ तसेच तहसील कार्यालय परिसरात सरकारविरोधी घोषणाबाजी करीत काँग्रेस कार्यकर्त्यांनी आपला निषेध व्यक्त केला. यावेळी नायब तहसीलदार चारुदत्त पाटील यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

निदर्शनादरम्यान काँग्रेस कार्यकर्त्यांनी विविध घोषणांच्या माध्यमातून आपल्या मागण्या मांडल्या. सरकारविरोधी घोषणाबाजीमुळे तहसील कार्यालयाचा परिसर दणाणून गेला होता. निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची किंवा त्यांना पदावरून हटविण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली.

या आंदोलनात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी सेलचे सचिव विपुल भडांगे, मोर्शी शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा नगरसेवक भूषण कोकाटे, गोलू शेख, मुरलीनाना डहाणे, महिला काँग्रेसच्या अध्यक्षा बबिता बोरेकर, सविता ठाकरे, पुष्पा परतेती, सुनीता कुमरे, सुरेश सिहले, अजीज पठाण, गजानन ठाकरे, पंकज विधळे, चंद्रशेखर तरारे, सय्यद फैझान, प्रकाश काळे, दिनेश बोरेकर, संकेत वानखडे, पंकज वाघमारे यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय

**कष्ट इतक्या शांततेत करा की तुमचे यश धिंगाणा घालेल.**

# धरणे भरली, पण पाण्याचे भविष्य सुरक्षित आहे का?

आजचा जलसाठा उद्याच्या पाणीटंचाईवरचा कायमस्वरूपी उपाय नव्हे; मुंबईकरांना दिलासा देण्यासाठी सरकारने केवळ आकडेवारी नव्हे, तर दूरदृष्टीचे नियोजन करणे गरजेचे! यंदा राज्यातील धरणे भरली आहेत, पाणीसाठ्याची स्थिती समाधानकारक आहे आणि मुंबईकरांना तूर्तास पाणीटंचाईची चिंता करण्याचे कारण नाही, असे चित्र दिसत आहे. मात्र, धरणे भरली म्हणजे पाण्याचा प्रश्न कायमचा सुटला, असा समज करून घेणे ही मोठी चूक ठरेल. कारण धरणांतील पाणीसाठा हा निसर्गाच्या कृपेवर अवलंबून असतो; परंतु त्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे ही सरकार आणि प्रशासनाची जबाबदारी आहे. आज धरणे भरलेली असताना उद्याच्या उन्हाळ्याचा विचार केला नाही, तर भरलेले जलाशयही मुंबईकरांना पाण्याची शाश्वती देऊ शकणार नाहीत. मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीला दररोज मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज असते. वाढती लोकसंख्या, झपाट्याने होणारे नागरीकरण, उंचच उंच इमारती, औद्योगिक विस्तार आणि बदलत्या जीवनशैलीमुळे पाण्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. दुसरीकडे, पावसाचे अनिश्चित स्वरूप, हवामानातील बदल आणि पाण्याचा वाढता वापर यामुळे भविष्यातील जलव्यवस्थापन अधिक आव्हानात्मक बनत आहे. अशा परिस्थितीत केवळ पावसाळ्यात धरणे भरली की समाधान मानणे पुरेसे नाही. उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब किती काळ पुरेल, त्याचा वापर कसा होईल आणि पुढील पावसाळ्यापर्यंत पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी कोणती पावले उचलली जातील, याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे.

पाणीसाठा वाढला, पण नियोजनाचे काय? दरवर्षी पावसाळ्यात धरणांतील पाणीसाठ्याची आकडेवारी जाहीर केली जाते. किती टक्के जलसाठा झाला, कोणते धरण किती भरले आणि किती पाणी उपलब्ध आहे, याची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचते. मात्र, या आकडेवारीपलीकडे जाऊन पाण्याच्या दीर्घकालीन नियोजनाची चर्चा कितपत होते? पावसाचे पाणी साठवण्यासाठी किती नवीन उपाययोजना राबविण्यात आल्या? शहरातील पाण्याची गळती रोखण्यासाठी किती प्रभावी पावले उचलली गेली? सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्याचे प्रमाण किती वाढले? पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी किती ठोस प्रयत्न झाले? या प्रश्नांची उत्तरेही तितकीच महत्त्वाची आहेत. धरणे भरल्यानंतर पाण्याचे योग्य वितरण, गळती नियंत्रण, पाणीवापराचे नियोजन आणि जलस्रोतांचे संवर्धन याकडे दुर्लक्ष झाले, तर मोठ्या प्रमाणातील जलसाठाही अपेक्षित परिणाम साधू शकणार नाही. पाण्याचा अपव्यय रोखणे ही केवळ नागरिकांची जबाबदारी नसून स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांनीही त्यासाठी कठोर व प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे.




# डॉ.एपीजे अब्दुल कलाम आणि वाचन प्रेरणा दिन

आज डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांची जयंती आहे. हा दिवस आपण प्रत्येक शाळेमध्ये वाचन प्रेरणा दिन म्हणुन साजरा करतो. त्यानिमित्ताने हा लेख आजच्या युवकासमोरील एक महत्त्वाचा आव्हान आहे. अवांतर वाचनाचा अभाव, असे म्हटले जाते वाचाल तर वाचाल. हे अगदी तंतोतंत खरे आहे.आजचा युवक वाचनापासून दूर कसा गेला त्याची वेगवेगळी कारणे आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचा कारण म्हणजे त्याच्या खिशातील स्मार्टफोन. त्याचा वापर एवढ्या जास्त प्रमाणात होतो की त्याला वाचनाकरिता वेळच उरत नाही पण आजच्या युवकाला प्रगल्भ होण्यासाठी स्मार्टफोनला बाजूला सारुन अवांतर वाचनाची आवड निर्माण करावी लागेल. त्याशिवाय त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होणार नाही.

अवांतर वाचनामुळे आपली विचारधारा प्रगल्भ होते. एखादे पुस्तक आयुष्याला कलाटनी देऊ शकते. पुस्तकाचं एखादं पान आयुष्याच ध्येय ठरवू शकते म्हणुन वाचनाला आपल्या जीवनात फार महत्त्व आहे. जसे आपल्या शरीराला दोन वेळा जेवणाची गरज असते तसेच आपल्या मेंदूला एक तास वाचनाची गरज असते. त्यामुळे आपली विचार करण्याची क्षमता वाढते. तुम्ही विद्यार्थी असाल उद्योजक असा नोकरीत असाल प्रत्येकाला वाचनाची आवश्यकता आहे. वाचनाशिवाय आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊ शकत नाही. वाचनामुळे आपल्या ज्ञानात भर पडते. वाचन करणारी माणसं विचाराने श्रीमंत होतात. वाचन केल्यामुळे मन शांत होते उच्च रक्तदाबाचा धोका राहत नाही. शांत झोप लागते माणूस आरोग्यसंपन्न व नम्र होतो.



म्हणुनच म्हणतात वाचाल तर वाचाल. वाचनाने माणुस कसा प्रगल्भ होतो? याचे एक मुर्तिमंत उदाहरण म्हणजे आघाडीचे सिनेमा दिग्दर्शक नागराज मंजुळे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा या गावचा एक विद्यार्थी ज्याला लहानपणीच वाईट सवय लागल्या दहावी नापास झाला पण त्याने रिकाम्या वेळेत गावातील वाचनालयातील सर्व पुस्तके वाचून काढली. त्याने वाचलेली पहीली कादंबरी मृत्युंजय. त्यानंतर त्याच्या विचारांचा वेग वाढला. त्याने वेगवेगळे साहित्य वाचून काढले महात्मा फुले, राजर्षी शाहू, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शंकर पाटील, शिवाजी सावंत इत्यादी विचारवंताचे साहित्य वाचून काढले. त्यामुळे त्यांची विचारधारा प्रगल्भ झाली म्हणुनच वेगवेगळ्या सामाजिक समस्येवर चित्रपट बनविण्यासाठी क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण झाली. हे उदाहरण देण्यामागचं कारण एकच. एका खेड्यातील अशिक्षित वातावरणातील एक विद्यार्थी वाचनामुळे एवढी प्रगती करु शकतो तर आपण का नाही? आपल्याला तर सर्व सुविधा प्राप्त आहेत गरज आहे फक्त मेहनतीची.

तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास करायचा असेल तर अवांतर वाचन फार आवश्यक असते. जीवन जगत असताना जे काही अडथळे येतात ते पार करण्याची क्षमता वाचनाने निर्माण करता येते. तुम्ही काय वाचता आहे ते फार महत्त्वाचं. इतरांच्या प्रेरक गोष्टी ज्या व्यक्तींनी शून्यापासून सुरुवात करून आपल्या जीवनात यश प्राप्त केल आहे अशा लोकांच्या प्रेरक गोष्टी विद्यार्थ्यांनी वाचल्या पाहिजेत. ते कसे घडले याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. प्रा.संजय नाथे यांची अशी अनेक पुस्तके आहेत जी वाचून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास होऊ शकतो. उदाहरणार्थ पुढचं पाऊल, प्रेरक गोष्टी, आम्ही असे घडलो. विजयपथ, यशवंत व्हा, आपणही असे घडावे, विचारातील सौंदर्य, शिखर गाठण्यासाठी, आकर्षणाचा नियम... अशी अनेक नाथे पब्लिकेशनची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी ती वाचली पाहिजेत, जेणेकरुन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा संपूर्ण विकास होईल .

मोबाईल वरील माहिती वाचणे किंवा प्रत्यक्ष पुस्तक वाचणे यामध्ये खुप फरक आहे. आज आपण मोबाईलच्या आहारी गेलेलो आहे. मोबाईल वरील माहिती वाचून आपण ज्ञान प्रदर्शन करण्याचा प्रयत्न करतो, पण ते साफ चुकीचे आहे, कारण प्रत्यक्ष वाचनामुळे जेवढं ज्ञान मेंदू पटलावर साठवता येते, तेवढं ज्ञान मोबाईल वाचनामुळे साठवता येऊ शकत नाही. तुम्हाला आपलं ज्ञान दृढ करायचं असेल तर तुम्हाला पुस्तक वाचनाशिवाय पर्याय उरत नाही.



प्रमोद इखे
नागपूर
मोबा.९८५०१०१३२९

# संघर्ष, समर्पण आणि न्यायाचा सन्मान!

जगात शांततेची भाषा बोलणारे अनेक जण आहेत; मात्र अन्यायाविरुद्ध उभे राहून, पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे व्यक्तिमत्त्व विरळाच असते. दक्षिण आफ्रिकेतील ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ, न्यायमूर्ती आणि मानवाधिकारांच्या खंबीर पुरस्कर्त्या नवनेथेम 'नवी' पिल्ले यांनी आपल्या प्रदीर्घ कार्यातून याच मूल्यांचा आदर्श जगासमोर ठेवला आहे. २०२६ चा नोबेल शांतता पुरस्कार त्यांना शांतता प्रस्थापित करणे आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या संवर्धनासाठी केलेल्या योगदानाबद्दल जाहीर झाला आहे. हा सन्मान केवळ एका व्यक्तीच्या कर्तृत्वाचा गौरव नसून, न्याय, समानता आणि मानवी प्रतिष्ठेसाठी लढणाऱ्या प्रत्येकाचा सन्मान आहे.

भेदभावाच्या वातावरणातून जागतिक नेतृत्वापर्यंत नवी पिल्ले यांचा जन्म १९४१ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील डरबन येथे भारतीय तमिळ वंशाच्या कुटुंबात झाला. त्या काळात दक्षिण आफ्रिकेत वर्णभेदाची व्यवस्था खोलवर रुजलेली होती. वंशाच्या आधारावर माणसांमध्ये भेदभाव केला जात होता आणि बहुसंख्य नागरिकांना समान अधिकारांपासून वंचित ठेवले जात होते. अशा प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत वाढलेल्या पिल्ले यांनी कायद्याचे शिक्षण घेतले आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचा मार्ग स्वीकारला. १९६७ मध्ये त्यांनी नाताल प्रांतात स्वतःची कायदेविषयक वकिली सुरू केली. त्या काळात कायद्याच्या क्षेत्रात महिलांसाठी, विशेषतः वर्णभेदाचा सामना करणाऱ्या महिलांसाठी, अनेक अडथळे होते. मात्र, या अडथळ्यांना न घाबरता त्यांनी आपली कारकीर्द घडवली. वर्णभेदाविरोधात आवाज उठवणाऱ्या कार्यकर्त्यांची बाजू मांडणे, राजकीय कैद्यांच्या अधिकारांचे संरक्षण करणे आणि वंचितांना न्याय मिळवून देणे, हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे पैलू ठरले.

त्यांच्या प्रवासातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी ज्ञान, धैर्य आणि तत्त्वनिष्ठा यांच्या बळावर परिवर्तन घडवता येते. स्वतःच्या प्रगतीपुरते मर्यादित न राहता समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख आहे.

न्यायव्यवस्थेतील ऐतिहासिक कामगिरी नवी पिल्ले यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९९५ मध्ये दक्षिण आफ्रिकेच्या उच्च न्यायालयात न्यायाधीशपदी झालेली त्यांची नियुक्ती. या पदावर नियुक्त होणाऱ्या त्या पहिल्या कृष्णवर्णीय महिला ठरल्या. वर्णभेदाच्या काळात ज्या समाजघटकांना समान संधी नाकारल्या जात होत्या, त्यांच्यासाठी ही कामगिरी प्रेरणादायी होती.

त्यानंतर त्यांनी रवांडासाठी स्थापन करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायाधिकरणात न्यायाधीश म्हणून काम केले आणि १९९९ ते २००३ या काळात त्याच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळली. रवांडातील नरसंहाराशी संबंधित खटल्यांमध्ये लैंगिक हिंसेला आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायाच्या चौकटीत महत्त्वाचे स्थान मिळवून देण्यात त्यांच्या कार्याचा प्रभाव पडला. विशिष्ट परिस्थितीत लैंगिक हिंसा ही नरसंहाराच्या गुन्ह्याचा भाग ठरू शकते, हे आंतरराष्ट्रीय न्यायव्यवस्थेतील ऐतिहासिक निर्णयातून स्पष्ट झाले.

या कामगिरीने जगाला दाखवून दिले की युद्धाच्या काळात किंवा संघर्षाच्या परिस्थितीत महिलांवर आणि दुर्बल घटकांवर होणारे अत्याचार दुर्लक्षित करता येणार नाहीत. गुन्हे करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि पीडितांना न्याय मिळवून देणे, ही शांततेच्या प्रक्रियेतील अत्यावश्यक बाब आहे. संयुक्त राष्ट्रांच्या माध्यमातून मानवाधिकारांचे संरक्षण २००८ ते २०१४ या काळात नवी पिल्ले यांनी संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार उच्चायुक्तपदाची जबाबदारी सांभाळली. या पदावर कार्यरत असताना मानवी हक्कांचे उल्लंघन, सामाजिक विषमता, महिलांवरील अन्याय आणि वंचित समुदायांच्या अधिकारांचे प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर मांडण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर होती. मानवाधिकार हे केवळ कागदावरील शब्द नसून प्रत्येक व्यक्तीच्या सन्मानाने जगण्याशी संबंधित मूलभूत मूल्य आहेत, ही भूमिका त्यांच्या कार्यातून ठळकपणे पुढे आली. एखाद्या व्यक्तीची जात, वंश, लिंग, भाषा किंवा सामाजिक परिस्थिती काहीही असो, तिला न्याय आणि समानतेचा अधिकार असला पाहिजे, हा विचार त्यांनी सातत्याने मांडला.




त्यांनी आंतरराष्ट्रीय फौजदारी न्यायालयातही न्यायाधीश म्हणून काम केले. पुढे २०२१ ते २०२५ या काळात त्यांनी पॅलेस्टिनी भूभागासह इस्रायलशी संबंधित प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या स्वतंत्र चौकशी आयोगाचे अध्यक्षपद सांभाळले. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत गंभीर आरोपांची चौकशी करणे आणि संबंधित घटनांची नोंद घेणे, हे या कामाचे महत्त्वाचे पैलू होते.

शांतता म्हणजे केवळ युद्धाचा अभाव नव्हे! शांततेचा विचार करताना अनेकदा युद्ध थांबणे किंवा दोन देशांमधील संघर्ष संपणे, एवढाच अर्थ घेतला जातो. मात्र, खरी शांतता निर्माण होण्यासाठी न्याय, समानता, मानवी हक्कांचा आदर आणि कायद्याचे राज्य या गोष्टी आवश्यक असतात. अन्याय सहन करणाऱ्या व्यक्तीला न्याय मिळत नसेल, समाजातील दुर्बल घटकांना सुरक्षितता नसेल आणि शक्तिशाली व्यक्तींना कायद्यापेक्षा वरचे स्थान मिळत असेल, तर अशा परिस्थितीत टिकाऊ शांतता प्रस्थापित होऊ शकत नाही.

नवी पिल्ले यांच्या कार्याचे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते. त्यांनी न्यायव्यवस्थेतील विविध जबाबदाऱ्या सांभाळताना आंतरराष्ट्रीय कायद्याच्या महत्त्वावर भर दिला. युद्धगुन्हे, मानवतेविरुद्धचे गुन्हे आणि नरसंहार यांसारख्या गंभीर अपराधांसाठी जबाबदार व्यक्तींवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे, ही भूमिका त्यांच्या कार्याच्या केंद्रस्थानी राहिली. आज जगभरात विविध संघर्ष, युद्धे आणि मानवी हक्कांचे प्रश्न उपस्थित होत असताना आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका अधिक महत्त्वाची बनली आहे. अशा काळात नवी पिल्ले यांना मिळालेला नोबेल शांतता पुरस्कार हा आंतरराष्ट्रीय कायदा आणि न्यायव्यवस्थेचे महत्त्व अधोरेखित करणारा ठरतो.

नोबेल पुरस्कार म्हणजे जबाबदारीची जाणीव नोबेल शांतता पुरस्कार हा जागतिक स्तरावरील प्रतिष्ठेचा सन्मान आहे. मात्र, या सन्मानामागे असलेली जबाबदारीही तितकीच मोठी आहे. नवी पिल्ले यांचा गौरव करताना जगाने केवळ त्यांच्या वैयक्तिक यशाकडे पाहू नये, तर त्यांनी ज्या मूल्यांसाठी आयुष्यभर काम केले, त्यांचा स्वीकार करण्याचाही प्रयत्न करावा.

अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे, पीडितांच्या बाजूने उभे राहणे, कायद्याचे राज्य मजबूत करणे आणि प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करणे, ही मूल्ये प्रत्येक लोकशाही समाजासाठी महत्त्वाची आहेत. त्यांची अंमलबजावणी केवळ न्यायालये किंवा आंतरराष्ट्रीय संघटनांपुरती मर्यादित राहता कामा नये. शासनव्यवस्था, सामाजिक संस्था आणि सामान्य नागरिकांनीही या मूल्यांचा आदर केला पाहिजे. नवी पिल्ले यांच्या जीवनप्रवासातून महिलांचे सक्षमीकरण आणि समान संधींचे महत्त्वही अधोरेखित होते. प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येत जागतिक न्यायव्यवस्थेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या त्यांच्या प्रवासाने अनेक पिढ्यांसमोर प्रेरणेचा आदर्श ठेवला आहे.

निष्कर्ष : न्यायातूनच शांततेचा मार्ग नवी पिल्ले यांचा नोबेल शांतता पुरस्कार हा संघर्ष, समर्पण, धैर्य आणि मानवसेवेच्या मूल्यांचा गौरव आहे. त्यांच्या कारकिर्दीने दाखवून दिले की शांततेसाठी प्रयत्न करणे म्हणजे केवळ संघर्ष थांबविण्याचे आवाहन नव्हे, तर अन्यायाची कारणे दूर करण्यासाठी सातत्याने काम करणे होय. जगाला आज शस्त्रस्पर्धेपेक्षा संवादाची, द्वेषापेक्षा सहिष्णुतेची आणि दडपशाहीपेक्षा न्यायाची अधिक गरज आहे.

आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर, मानवी हक्कांचे संरक्षण आणि गुन्हेगारांना जबाबदार धरण्याची व्यवस्था मजबूत झाली, तरच शांततेचा पाया अधिक भक्कम होऊ शकतो. नवी पिल्ले यांचा सन्मान हा एका व्यक्तीच्या कर्तृत्वाचा गौरव असला, तरी त्यातून मिळणारा संदेश संपूर्ण मानवजातीसाठी आहे शांततेचा मार्ग न्यायातून जातो आणि न्यायाची सुरुवात प्रत्येक माणसाच्या प्रतिष्ठेचा आदर करण्यापासून होते.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

## वसंतराव नाईक हायस्कूल येथे
# गांधी जयंती उत्साहात साजरी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – जरूडच्या वसंतराव नाईक हायस्कूल येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष रामचंद्र पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून कोषाध्यक्ष रामकृष्ण मेश्राम उपस्थित होते. यावेळी माजी प्राचार्य रामराव वानखडे, प्राचार्य विलास देवराळे, पर्यवेक्षक संदीप देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पणाने झाली. या प्रसंगी निशिगंधा काळे हिने प्रास्ताविक केले. त्यामध्ये तिने महात्मा गांधीजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला तसेच शिवकुमार चव्हाण यांनी लालबहादूर शास्त्री यांचा जीवनपट रंजक पद्धतीने विद्यार्थ्यांसमोर मांडला. काही विद्यार्थ्यांची भाषणे घेण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन रंजना शेळके यांनी केले. यावेळी रामकृष्ण मेश्राम व रामचंद्र पाटील यांनी गांधी विचारांचे आजच्या काळातील महत्त्व पटवून दिले. भाषणात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

शेवटी कृष्णा कळसकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## लोणीच्या श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात
# आनंददायी शनिवार निमित्त परिपाठ

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – लोणी येथील श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात आनंददायी शनिवार निमित्त परिपाठ घेण्यात आला. वर्ग ५ च्या विद्यार्थ्यांनी परिपाठ सादर केला. परिपाठा मध्ये राष्ट्रगीत, प्रतिज्ञा, संविधानाचे वाचन, सुविचार, दिनविशेष, प्रश्नमंजुषा, देशभक्तीपर गीत घेण्यात आली. प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आली. परिपाठाची तयारी प्रतिभा सावरकर यांनी करून घेतली. परिपाठाची सांगता सर्व विद्यार्थ्यांनी राष्ट्रवंदनाने करण्यात आली.

हा परिपाठ सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक सतीश खोडे, पर्यवेक्षक विलास चिमोटे आणि सर्व शिक्षक, शिक्षिकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या परिपाठाचे संचालन विद्यार्थी देवांश देवते, बोधकथा दर्शन बोरवार तर आभार धुप बारस्कर या विद्यार्थ्यांने मानले.




# विविध शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत सहकार मंत्र्यांची बैठक, ऊस उत्पादकांच्या प्रश्नांवर सकारात्मक निर्णयासाठी सरकार प्रयत्नशील

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – राज्यातल्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत लवकरच बैठक घेण्यात येणार आहे. शिवाय, साखरेची आधारभूत किंमत आणि ऊस उत्पादकांच्या योग्य आणि परवडणाऱ्या दरासंदर्भातील मागण्यांवर सकारात्मक निर्णय व्हावा, यासाठी शेतकरी संघटनांच्या प्रतिनिधींचे शिष्टमंडळ केंद्र शासनाकडे नेण्यात येईल, असे आश्वासन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले.

## डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये
# माहिती अधिकार सप्ताह उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरूड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये आयक्यूएसी, राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने माहिती अधिकार सप्ताह ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, प्रमुख वक्ते म्हणुन प्रा.सुधीर बानुबाकोडे तर प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ.प्रशांत चर्जन, कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर, ग्रंथपाल डॉ.राजेश बोबडे उपस्थित होते. प्रा.सुधीर बानुबाकोडे यांनी लोकशाही व्यवस्थेत माहिती अधिकाराचे महत्व, व्याप्ती, उद्देश व त्याचे विविध पैलू उपस्थितांसमोर मांडून माहिती अधिकार हा भारतीय जनतेला मिळालेला सर्वात मोठा अधिकार असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. माहिती अधिकार या विषयावर आधारित निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक दीपशिखा दरवई, द्वितीय निशा पाटील तर तृतीय क्रमांक ईश्वरी गव्हाणे यांनी पटकाविला. प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी शासन, प्रशासन व विविध सामाजिक संस्था यांचा व्यवहार पारदर्शी व विश्वासपूर्ण करण्यासाठी माहिती अधिकार महत्त्वाचा असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जागृत इंग्लिश प्रायमरी अँन्ड हायर प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रात घवघवीत यश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – जागृत इंग्लिश प्रायमरी अँन्ड हायर प्राइमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय संपादन करून शाळेच्या नावलौकिक वाढविला आहे.

रुद्र शेटे याने ७ ते ९ ऑक्टोबर दरम्यान अकोला येथे शालेय तायक्वांडो क्रिडा स्पर्धेत रौप्य पदक मिळवुन यशाचा मान मिळविला आहे तर असलान खान २८ ते ३० सप्टेंबर रोजी संभाजीनगर येथे शालेय वुशु क्रिडा स्पर्धेत कास्यपदक मिळविले यश प्राप्त केले आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत विविध भागातील खेळाडू सहभागी झाले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांची जिद्द, आत्मविश्वास आणि मेहनतीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना लढत देत पदकावर आपले नाव कोरले आहे. शाळेसाठी विद्यार्थ्यांचे हे यश अत्यंत अभिमान आणि आनंदाची बाब आहे.



त्यांच्या मेहनत, जिद्द आणि क्रीडा कौशल्याचे हे फलित असल्याचे बोलल्या जात आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल जागृत नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गिरीश गांधी, उपाध्यक्ष डॉ.मनोहर अंडे, सचिव संतोष क्षिरसागर, मुख्याध्यापिका पूजा मांडवगडे, पर्यवेक्षका उज्वला लाडोळे, शिक्षक व क्रीडा प्रेमींनी त्यांच्या अभिनंदन केले आहे.

# अमरावती येथे पडलेल्या जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत उत्क्रांतीची गरुडझेप

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – युवक व क्रीडा संचालनालय पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्रांगणात संपन्न झाल्या. या मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये उत्क्रांती शिक्षण संस्थेच्या वसंतराव नाईक हायस्कूलच्या खेळाडूंनी उत्तम कामगिरी करून यशस्वी परंपरा कायम राखली.

वयोगट १४ वर्षातील मुले या स्पर्धेमध्ये संविधान कुकडे याने ६०० मीटर धावणे तर संवेद खापरे याने ४०० मीटर धावणे स्पर्धा प्रकारात प्रथम स्थान पटकाविले. १७ वर्षातील मुली या वयोगटातील स्पर्धेत चांदणी थोटे हिने ४०० मीटर धावणे या क्रीडा प्रकारात तर पूर्वी बहुरूपी हिने १०० मीटर अडथळा शर्यत या स्पर्धेत तृतीय स्थान मिळविले.

१९ वर्षातील मुली या वयोगटामध्ये वेदिका खेरडे, पार्थवी हरले, भूमिका लाड, निधी ददघाये, ज्ञानेश्वरी हजारे या खेळाडूंनी फोर बाय हंड्रेड मीटर रिले रेस या स्पर्धेत द्वितीय, फोर बाय हंड्रेड मीटर रिले रेस या क्रीडा प्रकारात प्रथम स्थान प्राप्त केले तसेच चेतन मोहरे याने क्रॉस कंट्री स्पर्धेत द्वितीय स्थान प्राप्त केले.

संस्थाध्यक्ष रामचंद्र पाटील, प्रशासक रामराव वानखडे, सचिव निलेश गुर्जर, कोषाध्यक्ष रामकृष्ण मेश्राम तसेच माजी अध्यक्ष देविसिंह खुटपळे, क्रीडा शिक्षक संदीप बोराडे, मुख्याध्यापक विलास देवराळे, पर्यवेक्षक संदीप देशमुख, शिवाजी वानखडे, डॉ.सुशिल पाटील, डॉ.नितीन वानखडे, निशिकांत वसुले तसेच उत्क्रांती मंडळाचे सर्व सदस्य,अनिल सलामे, योगेश वानखडे ,धर्मेद्र राईकवार, अनिस पठाण, दीपक खासबागे तसेच सर्व शिक्षक, शिक्षकांनी विभागीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या आहेत.

## शालेय वुशू मार्शल आर्ट स्पर्धेमध्ये
# न्यू इंग्लिश हायस्कूलचा अजय बानाईत राज्यस्तरावर

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**वरूड** – क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती द्वारा आयोजित विभागीय स्तरिय शालेय वुशू मार्शल आर्ट स्पर्धेमध्ये न्यू इंग्लिश हायस्कूलचा विद्यार्थी अजय बानाईत याने १७ वर्षे वयोगटामध्ये ५० ते ५२ वजन गट मधून विजयी होऊन राज्यस्तरावर निवड झाली तर बी.डी.कन्या शाळा जरुडची भाविका वाघमारे ४८ ते ५० वजन गटमध्ये व श्रीजीत वाघमारे ६२ ते ६५ वजन गटामध्ये या दोन विद्यार्थ्यां उपविजयी झाल्याबद्दल मुख्याध्यापक, शिक्षक वृंद तसेच कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थी व प्रशिक्षक राम पांडे यांचे अभिनंदन केले तसेच गेल्या २ वर्षापासून शहापूर येथे जि.प.शाळा परिसरामध्ये शिक्षक मनीष दिघेकर यांच्या माध्यमातून श्रीराम पांडे हे विद्यार्थ्यांना शालेय खेळ बॉक्सिंग, ज्युडो, कराटे, किक-बॉक्सिंग व वुशू या खेळाचे मोफत प्रशिक्षण देत आहेत.

यामुळे जि.प.शाळेतील विद्यार्थी मागील वर्षापासुन विभागस्तरावर सुध्दा चांगली कामगिरी करीत आहे.

या केंद्रामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या अजयची राज्यस्तराकरीता निवड झाली तर श्रीजीत व भाविका वाघमारे यांना उपविजयी झाले. श्रीजीत व भाविका हे दोघेही गेल्या २ वर्षापासुन प्रशिक्षण घेत असून दोघेही शालेय विभागीयस्तरिय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये सुध्दा उपविजयी ठरले.

याबद्दल शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुखांसह शहापूरचे सरपंच व नागरिकांनी विद्यार्थी व प्रशिक्षक राम पांडे यांचे अभिनंदन केले आहे.

# स्वामी विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा युवा महोत्सवात सहभाग

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

## खापरा आदिवासी नृत्याच्या आकर्षक सादरीकरणाने वेधले लक्ष





**वरूड** – संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या वतीने आयोजित आंतरमहाविद्यालयीन युवा महोत्सव २०२६-२७ हा राजश्री शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, बुलढाणा येथे २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत उत्साहात संपन्न झाला. या युवा महोत्सवात स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सायन्स अँड आर्ट्सच्या विद्यार्थ्यांनी विविध कला प्रकारांत उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. या युवा महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले खापरी आदिवासी नृत्य होय. पारंपरिक आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या नृत्याचे विद्यार्थ्यांनी आकर्षक आणि प्रभावी सादरीकरण केले. यासोबतच माईमसह इतर कला प्रकारांमध्येही विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या कलात्मक कौशल्याची प्रचिती दिली. विद्यार्थ्यांना विद्यापीठ स्तरीय सांस्कृतिक व्यासपीठावर आपली कला सादर करण्याची संधी मिळावी, या उद्देशाने महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या अध्यक्ष प्रा.संजीवनी बारस्कर यांनी युवा महोत्सवाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यापासून ते त्यांच्या सहभागासाठी आवश्यक तयारी आणि नियोजन करण्यापर्यंत त्यांनी महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. या कार्यात प्रा.आशिष शहाणे यांनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.प्राची ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होता यावे, या दृष्टिकोनातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या युवा महोत्सवातील सहभागामुळे विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्याची, इतर महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची आणि सांस्कृतिक क्षेत्रातील अनुभव समृद्ध करण्याची संधी मिळाली. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सांस्कृतिक उपक्रमांना दिलेले प्रोत्साहन या सहभागातून अधोरेखित झाले.

# उत्क्रांती वाचनालयाचे वतीने 'डॉ.कलाम यांचे जीवन' विषयावर आज व्याख्यानमाला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – समाजाचा सर्वांगिण विकास व्हावा, विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा या दृष्टीने उत्क्रांती वाचनालयाचे दरवर्षी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. या वर्षी सुध्दा वाचनालयाचे वतीने उद्या १५ ऑक्टोंबर ला सायंकाळी ६ वाजता भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे जयंतीनिमित्याने डॉ.कलाम यांचे जीवनचरित्र या विषयावर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाला कार्यक्रमाध्यक्ष म्हणुन डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी महाविद्यालयाचे प्राचार्य आर.एन.फुलारी उपस्थित राहणार आहे. प्रमुख व्याख्याते म्हणुन सेवानिवृत्त प्रा.अरुण कावनपुरे, सेवानिवृत्त प्राचार्य सी.टी.पठाण उपस्थित राहणार आहे. या पुर्वी उत्क्रांती वाचनालयाच्या वतीने ४ सप्टेंबर ते ४ ऑक्टोंबर या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांकरीता वाचन विकास योजना राबविण्यात आली होती.

या योजनेअंतर्गत वर्ग ५ ते ९ च्या विद्यार्थ्यांना एक महिना कालावधीकरीता मोफत संस्कारक्षम पुस्तके वाचावयास देण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांवर आधारीत सामान्य ज्ञान परिक्षा ४ ऑक्टोंबर रोजी घेण्यात आली. सामान्य ज्ञान परीक्षेमधील प्रत्येक वर्गातून तीन गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या कार्यक्रमामध्ये गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांना बक्षिस व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे तसेच उत्क्रांती वाचनालय संलग्न स्व.लिलाबाई शामरावजी वानखडे अभ्यासिकेतील शासकीय नोकरीत नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी सत्कार करण्यात येणार आहे.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ), दुसरे सहदिवाणी न्यायाधिश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८९७/२०२६ नेे.ता.१६/११/२०२६**

अर्जदार :- १) सत्यफुला उकंडया बागडे, वय अं.६८ वर्ष, धंदा-घरकाम, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती, २) नरेंद्र उकंडराव बागडे, वय अं.५२ वर्ष, धंदा-मजूरी, रा.संतोषी माता वार्ड, पांढुर्णा, ता.जि.पांढुर्णा, ३) सिद्धार्थ उकंडराव बागडे, वय अं.४० वर्ष, धंदा-मजूरी, रा.बुध्द विहार, सावनेर, ता.सावनेर, ४) कल्पना प्रल्हाद ढोके, वय अं.४७ वर्ष, धंदा-घरकाम, रा.पुसला, ता.वरुड, ५) मंगला प्रदीप गजभिये, वय अं.४३ वर्ष, धंदा-घरकाम, रा.नर्मदा भवन, हुजूर, ता.जि.भोपाल

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत उकंडराव मांडोशा बागडे, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१६/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१२/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ), दुसरे सहदिवाणी न्यायाधिश ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९०९/२०२६ नेे.ता.१९/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) चंद्रकला देविदास अढाऊ, वय अं.५९ वर्ष, धंदा-घरकाम
२) राहुल देविदास अढाऊ, वय अं.३८ वर्ष, धंदा-मजुरी
अर्जदार क्र.१ व २ रा.मालखेड, पो.धनोडी, ता.वरुड
३) मनिषा नरेंद्र पाटील, वय अं.४० वर्ष, धंदा-घरकाम
रा.सौंसर, ता.सौंसर, जि.पांढुर्णा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत देविदास रामचंद्र अढाऊ, रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### महात्मा फुले कला, वाणिज्य व सितारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयात

# वन्यजीव संवर्धन, संरक्षण व जैवविविधतेबाबत जनजागृती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – महात्मा फुले महाविद्यालय येथे २ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. वन्यजीवांचे संवर्धन व संरक्षण तसेच जैवविविधतेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने सप्ताहादरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या सप्ताहात विद्यार्थ्यांसाठी पोस्टर, निबंध तसेच पोस्टर प्रदर्शन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून वन्यजीव संरक्षण, पर्यावरण संवर्धन आणि जैवविविधतेचे महत्त्व या विषयांवर आपल्या कलागुण व विचारांचे प्रभावी सादरीकरण केले.

पोस्टर प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या आकर्षक व माहितीपूर्ण पोस्टर्सद्वारे वन्यजीवांचे महत्त्व, त्यांच्यासमोरील धोके तसेच वन्यजीव संवर्धनासाठी आवश्यक उपाययोजनांची माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव व पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली. यावेळी डॉ.एस.व्ही.सातपुते व डॉ.एस.आर.कोंडुलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वन्यजीवांचे संरक्षण ही केवळ शासनाची किंवा वनविभागाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, असे त्यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ.डी.व्ही.हांडे यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव सप्ताहाचे महत्त्व समजावून सांगितले. वन्यजीव हे पर्यावरणीय समतोल राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असून जंगलतोड, शिकारी, प्रदूषण आणि वन्यजीवांच्या अधिवासाचा ऱ्हास यामुळे अनेक प्रजातींच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ.एस.आर.कोंडुलकर, डॉ.बी.एस.राहिले, डॉ.वैशाली तिनखेडे, डॉ.कुशल इंगळे, भावना चुरे, शिवानी सरोदे तसेच इतर प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. 'वन्यजीव वाचवा, पर्यावरण वाचवा' हा संदेश देत वन्यजीव सप्ताहाची सांगता करण्यात आली.

# ... तर द्विपक्षीय संबंधांवर परिणाम होतील : भारत-चीन सीमावादावर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचा स्पष्टइशारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – भारत आणि चीन यांच्यातील संबंध सामान्य करण्यासाठी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील (एलएसी) परिस्थिती स्थिर असणे आवश्यक आहे. सीमेवर कोणत्याही प्रकारचा तणाव निर्माण झाल्यास त्याचे परिणाम द्विपक्षीय संबंधांवर होतील, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी स्पष्ट केले. दोन्ही देशांमधील व्यापार आणि गुंतवणूक संबंधांचा विस्तारही सीमेवरील शांतता आणि स्थैर्याशी निगडित असल्याचे त्यांनी सांगितले.

'चीनला आम्ही सांगतो की, तुम्हाला सामान्य संबंध हवे असतील आणि द्विपक्षीय संबंधांमधील अन्य क्षेत्रांतही प्रगती अपेक्षित असेल, तर सीमावर्ती भागातील परिस्थिती स्थिर असणे आणि तेथे शांतता व सलोखा कायम राहणे आवश्यक आहे. ही अगदी साधी आणि तर्कसंगत बाब आहे,' असे जयशंकर यांनी सांगितले. 'ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरम'मध्ये बोलताना जयशंकर म्हणाले की, २०२४ पासून प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थितीत मोठ्या प्रमाणात सुधारणा झाली आहे. त्यानुसार, भारत आणि चीनमधील संबंधही हळूहळू सामान्य स्थितीकडे वाटचाल करत आहेत. सीमावादावर लवकर तोडगा काढण्याबाबत प्राथमिक स्वरूपाचा करार झाल्यास भारत चीनमधील गुंतवणुकीला अधिक संधी देईल का, असा प्रश्न जयशंकर यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी विविध शक्यतांचा विचार सुरू असल्याचे सांगितले. आम्ही सध्या या शक्यतांचा विचार करत आहोत.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ), दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८६४/२०२६ नेे.ता.०२/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) मनिष यादवराव फुटाणे, वय अं.३४ वर्ष, धंदा-शेती
२) कांचन मनोज सिनकर, वय अं.३६ वर्ष, धंदा-घरकाम
अर्जदार क्र.१ व २ रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती
३) गायत्री ललीत ढोरे, वय अं.३२ वर्ष, धंदा-घरकाम
रा.मोवाड, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत यादवराव पंढरीनाथ फुटाणे व मयत मंदाबाई यादवराव फुटाणे, रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०२/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१३/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर ( प्रभारी ), दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८९१/२०२६ नेे.ता.०७/११/२०२६**

**अर्जदार :-**

अहेली पुण्या राऊत
वय अं.७८ वर्ष, धंदा-घरकाम
रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पुण्याजी उकंड्या राऊत, रा.पुसला, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१३/११/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ ( ३ ) सुधारित अधि.२०२६ च्या कलम ३( अ ) अन्वये जन्माची नोंद वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर साहेब, दिवाणी व फौजदारी न्यधिश, वरुड यांचे न्यायालयात.**

**एम.जे.सी.क्रं.१९३/२०२६ नेे.ता.०७/११/२०२६**

**अर्जदार :-** विजय हरिचंद्र नाईक
वय अं.४६ वर्ष, धंदा-मजुरी
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-**मुख्याधिकारी साहेब, नगर परिषद कार्यालय
वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

ज्याअर्थी वरील अर्जदार **नामे विजय हरिचंद्र नाईक याचा जन्म दि.०२/१२/१९८० रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबतची नोंद गैरअर्जदार कार्यालयात नसल्यामुळे, गैरअर्जदार कार्यालयाचे कोर्टाने आदेशानुसार उपरोक्त जन्माची नोंद घ्यावी याकरीता सदर्हु प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ ॲण्ड डेथ ॲक्टचे १९६९ च्या कलम १३ (३) व सुधारीत ॲक्ट २०२६ चे कलम ३ (अ) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्याकरीता न्यायलयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेले आहे.

त्याअर्थी ज्या कोणास **विजय हरिचंद्र नाईक याचा जन्म दि.०२/१२/१९८० रोजी वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** येथे झालेल्या असल्याबाबत काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तरी त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१२/१०/२०२६** रोजी माझी सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९११/२०२६ नेे.ता.३०/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती यशोदा पांडुरंग खासबागे, वय अं.६७ वर्ष, धंदा-घरकाम, २) अशोक पांडुरंग खासबागे, वय अं.४५ वर्ष, धंदा-मजुरी, ३) मनोज पांडुरंग खासबागे, वय अं.४३ वर्ष, धंदा-मजुरी, ४) दिनेश पांडुरंग खासबागे, वय अं.४० वर्ष, धंदा-मजुरी, क्र.१ व ४ रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत पांडुरंग महादेवराव खासबागे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१२/१०/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# अडीच वर्षांत वरुडला २१ लाख : मोर्शीच्या पदरी भोपळा!

*** खासदार अमर काळे यांच्या निधीवाटपाची माहिती अधिकारातून उघड**

*** मोर्शी तालुक्यात एकही काम नमूद नसल्याने प्रश्नचिन्ह**

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**वरुड** – वर्धा लोकसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमर काळे यांच्या माध्यमातून वरुड व मोर्शी तालुक्यांत एप्रिल २०२४ ते जून २०२६ या कालावधीत देण्यात आलेल्या निधीची माहिती समोर आली आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त प्रमाणित दस्तऐवजानुसार, वरुड तालुक्यातील दोन कामांसाठी एकूण २१ लाख रुपयांची रक्कम नमूद करण्यात आली आहे. मात्र, याच दस्तऐवजात मोर्शी तालुक्यातील एकाही कामाची नोंद नसल्याने निधीवाटपाच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. एकीकडे खासदार अमर काळे मोठा गाजावाजा करुन सर्वसामान्यांसमोर धुळफेक करीत असल्याचे दिसुन येत आहे.

**वरुड तालुक्यात दोन कामांसाठी २१ लाख**

प्राप्त दस्तऐवजात नमुद माहितीनुसार, वरुड तालुक्यातील दोन कामांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये वरुड येथील न्यू इंग्लिश हायर सेकंडरी स्कूल येथे सौर ऊर्जा युनिट बसविण्यासाठी ६ लाख रुपये, तर नांदगाव, ता.वरुड येथील ग्रामपंचायत भवनाच्या बांधकामासाठी १५ लाख रुपये नमुद आहेत. या दोन्ही कामांची एकत्रित रक्कम २१ लाख रुपये होते.

वरुड तालुक्यातील विविध गावांमध्ये विकासकामांची गरज असताना, संबंधित कालावधीत दस्तऐवजात केवळ दोन कामांचा समावेश दिसून येत आहे. त्यामुळे या कामांव्यतिरिक्त अन्य कोणती कामे प्रस्तावित झाली, त्यांना मंजुरी मिळाली का आणि निधीवाटपाची प्रक्रिया कशी झाली? याबाबत



अधिक माहिती समोर येणे आवश्यक आहे.

**मोर्शी तालुक्याला निधी मिळालाच नाही?**

या दस्तऐवजात मोर्शी तालुक्यातील कोणत्याही कामाचा उल्लेख नसल्याने मोर्शी तालुक्याच्या वाट्याला निधी आला की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मोर्शी तालुक्यातील रस्ते, सार्वजनिक सुविधा, ग्रामविकास आणि इतर मूलभूत गरजांच्या पार्श्वभूमीवर निधीवाटपाची सविस्तर माहिती जाहीर करण्याची आवश्यकता आहे. मात्र, या कागदपत्रात कामांची नोंद नसणे आणि संपूर्ण तालुक्याला कोणत्याही योजनेतून निधी मिळालेला नसणे या दोन वेगळ्या बाबी आहेत.

**खासदारांच्या विकासकामांचा हिशेब जनतेसमोर येणार का?**

लोकप्रतिनिधींच्या निधीतून होणाऱ्या विकासकामांचा लाभ ग्रामीण भागातील नागरिकांना मिळणे अपेक्षित असते. त्यामुळे कोणत्या गावासाठी किती निधी मंजूर झाला, कोणती कामे पूर्ण झाली, कोणती प्रलंबित आहेत आणि नवीन प्रस्तावांची सद्यस्थिती काय आहे, याची माहिती सार्वजनिक होणे महत्त्वाचे आहे.

खासदार अमर काळे यांच्या माध्यमातून वरुड आणि मोर्शी तालुक्यांत झालेल्या कामांची संपूर्ण यादी, निधी मंजुरीचे आदेश आणि खर्चाचा तपशील उपलब्ध झाल्यास या विषयातील वस्तुस्थिती अधिक स्पष्ट होईल. विशेषतः मोर्शी तालुक्यातील कामांची नोंद नसण्यामागील कारण स्पष्ट होणे आवश्यक आहे.

**जनतेच्या अपेक्षांचे काय?**

वरुड आणि मोर्शी तालुक्यांतील नागरिकांना स्थानिक विकासकामांकडून मोठ्या अपेक्षा आहेत. अशा परिस्थितीत एका तालुक्यात दोन कामांसाठी २१ लाख रुपयांची नोंद असताना दुसऱ्या तालुक्यातील कामांचा उल्लेख नसणे हा चर्चेचा विषय ठरत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार अमर काळे यांनी दोन्ही तालुक्यातील विकासकामे आणि निधीवाटपाबाबत सविस्तर माहिती जनतेसमोर मांडावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

माहिती अधिकारातून प्राप्त प्रमाणित दस्तऐवजामुळे निधीवाटपाचा मुद्दा ऐरणीवर आला असून, मोर्शी तालुक्यातील कामांची स्थिती आणि दोन्ही तालुक्यांसाठी झालेल्या एकूण निधी वाटपाचा तपशील समोर आल्यानंतरच संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे.

## शासनाच्या १०८ अनब १०२ च्या सेवेचं एकत्रीकरण होणार, नव्याने ४,५०० रुग्णवाहिका सेवेत



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – राज्यातील आपत्कालीन आरोग्य सेवा अधिक सक्षम, दर्जेदार आणि वेगवान करण्यासाठी १०२ आणि १०८ या दोन्ही रुग्णवाहिका सेवांचे एकत्रीकरण करण्यात येणार आहे.

वर्षअखेरीपर्यंत राज्यभरात ४ हजार ५०० नवीन अत्याधुनिक रुग्णवाहिका सेवेत दाखल करण्याचे नियोजन असून, यामुळे रुग्णांना वेळेत वैद्यकीय मदत मिळणे अधिक सुलभ होईल, अशी माहिती सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. सध्या अपघात आणि गंभीर आजारांसाठी १०८, तर गर्भवती महिला व बालकांसाठी १०२ ही रुग्णवाहिका सेवा स्वतंत्रपणे कार्यरत आहे. या सेवांमधील तांत्रिक अडचणी आणि समन्वयाच्या अभावामुळे काही वेळा रुग्णवाहिका मिळण्यास विलंब होतो. हे लक्षात घेऊन दोन्ही सेवांचे एकत्रीकरण करून एकाच मध्यवर्ती नियंत्रण कक्षातून कॉलचे व्यवस्थापन केले जाणार आहे.

## ...तर महाविद्यालयांवर होणार कारवाई

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक दिलासा देण्यासाठी कोणत्याही विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता त्यांचे परीक्षा अर्ज भरून घेण्यात यावेत.

राज्यातील दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक दिलासा देण्यासाठी कोणत्याही विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क न घेता त्यांचे परीक्षा अर्ज भरून घेण्यात यावेत. ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल करण्यात आले आहे, ते शुल्क त्यांना परत करण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल



केल्याचे आढळल्यास संबंधित महाविद्यालयांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले आहेत. सह्याद्री अतिथिगृह, मुंबई येथे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व विद्यापीठांच्या सार्वजनिक कुलगुरूंसोबत ऑनलाइन बैठक घेण्यात आली. या बैठकीत दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काचा आढावा घेण्यासह विद्यापीठांच्या परीक्षा प्रक्रिया, पेपरफुटी रोखण्यासाठी उपाययोजना, निकालांमधील सुसूत्रता, शैक्षणिक वेळापत्रक, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आणि विद्यार्थी निवडणुकांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

## आरोग्य खात्यातील खासगी कंत्राटी महिला कर्मचाऱ्यांना १८० दिवसांची पगारी प्रसूती रजा मंजूर लवकरच परिपत्रक निर्गमित होणार

*(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

**मुंबई** – राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत १,७०० हून अधिक बाह्यस्रोत आरोग्य कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांवर मुंबई महानगरपालिकेने सकारात्मक पावले उचलली आहेत. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी या प्रकरणात पुढाकार घेतला आहे. प्रशासनाकडून कार्यवाही अहवाल प्राप्त झाल्यानंतर मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी बुधवारी १४ ऑक्टोबर २०२६ रोजी आंदोलकांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली आणि त्यांना कार्यवाहीची माहिती दिली.

खासगी संस्थांच्या वतीने नियुक्त आरोग्य कर्मचाऱ्यांचे विविध



मागण्यांसाठी मागील काही दिवसांपासून आझाद मैदान येथे आंदोलन सुरू आहे. मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी ५ ऑक्टोबर २०२६ रोजी आंदोलनस्थळी प्रत्यक्ष भेट देऊन कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधला व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. कोविड-१९ संसर्गाच्या संकटकाळात मुंबईकरांची सेवा करणाऱ्या या कर्मचाऱ्यांच्या मागण्या केवळ कागदावर न राहता लवकर निकाली निघाव्यात, यासाठी महापौर तावडे यांनी प्रशासनाला पत्र लिहून ठोस उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.

त्यानुसार, सार्वजनिक आरोग्य खात्याकडून महापौर रितू तावडे यांना सविस्तर अहवाल सादर करण्यात आला. आंदोलनकर्त्या कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने बुधवारी १४ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी महापौर रितू तावडे यांची महापौर निवासस्थानी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.




